MINUTES OF THE ENVIRONMENTAL PUBLIC HEARING OF EXPANSION OF EXISTING PROJECT FOR MANUFACTURE OF MINING EXPLOSIVES AND PROPOSED HIGH ENERGY DEFENCE PRODUCTS AT M/S. C-DET EXPLOSIVE INDUSTRIES PVT. LTD., VILL-MOUZA-TALEGAON (S.P.), TAH.ASHTI, DIST-WARDHA DATED 06-08-2019.

Environmental Public Hearing in respect of expansion of existing project for manufacture of mining explosives and proposed high energy defence products at M/s.C-DET Explosive Industries Pvt. Ltd., Vill-Mouza-Talegaon(S.P.), Tah.Ashti, Dist-Wardha under the Chairmanship of Smt. Vijaya Bankar, Additional District Magistrate & Resident Deputy Collector, Wardha (A representative nominated by the District Collector, Wardha). Shri.Rahul Wankhede, Regional Officer, M.P.C.Board, Nagpur was the member of the public hearing panel and Shri.Anand Katole, Sub-Regional Officer, M.P.C.Board, Nagpur-II act as a convener. The Public Hearing started at 12.00 hrs. with the permission of the Chairman of the Public Hearing Panel. Attendance of the People present during the Public Hearing is attached as **Annexure-I.**

BACKGROUND :

CDET Explosive Industries Pvt. Ltd. (CDET) was established in the year 1998 and commenced production in January 2005. The company manufactures explosive initiating devices & mining explosives and is classified as Hazardous industry. The company and its top management are committed to implement effective safety, operations and work environment parameters to ensure a safe working environment.

The company is already in the business of manufacturing explosive initiating devices mining explosives and proposes the expansion for backward integration and into production of primarily defence applications. Considering the strategic location of Nagpur/Wardha, the Government of India (GOI) has decided to develop as defence production hub in the area and considering this business opportunity, the management of CDET has decided to expand the range of products to include production required for defence applications. CDET shall obtain the required licenses from the Department of Industrial Policy and Promotion, GOI. CDET is one of the leading manufacturers of explosive initiating devices/high energy products in India and has adequate experience in the line of the proposed business.

In order to fulfill statutory requirement for the expansion of existing project for manufacture of mining explosives and proposed high energy defence products to obtain environmental clearance, Form-1, Pre-feasibility report along with proposed draft TOR were submitted to MoEF & CC. A standard TOR was issued by the Expert Appraisal Committee (EAC-Industry2) New Delhi. The committee approved the Terms of Reference, vide letter F.No.IA-J-11011/166/2018-IA.II(I) dated 21 June, 2018 Ministry of Environment, Forest and Climate Change, EAC, New Delhi.

CDET has retained M/s. Anacon Laboratories Pvt. Ltd. Nagpur to undertake Environmental Impact Assessment (EIA) studies as per the Terms of Reference (TOR) approved by MoEF & CC, New Delhi.

PURPOSE AND PROCEDURE :

With the permission of Chairman of Public Hearing the Sub-Regional Officer-II, MPCB, Nagpur has started Public Hearing by welcoming the Chairman and Member of the public hearing panel, local citizens from the village and others who were present.

Chairman of the Public Hearing Panel stated that, this Public Hearing is for recording the views/objects/suggestions of the participants regarding the project. The same will be communicated to the Government. She also clarified that this panel is not here to take decision for accordance of any approval to the project. She then appealed the participants to express their views.

Sub-Regional Officer-II, MPCB, Nagpur explained the purpose of conducting this public hearing that as per MoEF, GOI Notification SO 60(E) of 27th January, 1994 and amended on 14th September, 2006. The notices for the public hearing was published in two local widely circulated news papers i.e. the 'Hitavada' (English) and 'Sakal' (Marathi) on 02/07/2019. Copies of the same are enclosed as **Annexure-II.** Copies of the executive summary / EIA containing salient features of the project & EIA both in English and in Marathi and other information/documents were made available to the public by making these documents available in various Govt. offices as well as local Gram Panchayat as per MoEF GOI Notification. Suggestions, comments and objections of the public were called in writing till before the date of Public Hearing from the publication of the notice. The public hearing panel was constituted vide MPC Board Office Order No. E-49/2019 vide letter No. BO/JD/(WPC)/PH/B-2663 dtd. 17/07/2019. Copy of the same is enclosed as **Annexure-III.**

Thereafter, Sub-Regional Officer-II, Nagpur and Convener requested the project proponent to give their detail presentation about the project and the Environmental issues related with it. Accordingly, representative of the project proponent gave detailed power point presentation of the project in local language as under:

Project proponent has given information regarding project undertake by M/s. CDET Explosives Pvt. Ltd. expansion of existing project for manufacture of mining explosives and proposed high energy defence products. He further explained regarding project location, benefits of proposed project, proposed facilities, fire-fighting facilities, process description, description of environment and identification of anticipated impact, Land environment, climate and meteorology, Air Environment, existing water quality, water consumption, biological environment, socio-economic environment, impact on local infrastructure, environment management plan, air emission, preventive maintenance / inspection,

<u>PROCEEDINGS</u> :-

1. **Mr. Rupesh Dhobale, Talegaon.**
   - The water requirement for present as well as proposed expansion project is more than twice the total water requirement of surrounding villages. What type of treatment arrangement proposed and its utilization proposed by the industry.
   - While studying the 10 km radius area, only the forest is mentioned, but the name of villages are not mentioned. Give the name of villages/places where underground water samples were taken during the impact assessment study?
   - It is required to plant 1500 trees per hectare. Whether industry has planted trees on 33% of open land in this ratio.

2. **Mr. Chandrasekhar, Talegaon.**
   - What is the meaning of public hearings? If the Gramsabha has a rights to give the permission of expansion to industry if, yes how can this public hearing be held in private premises, when the Gram Sabha has the authority. Whether industry will take responsibility regarding damages to the villagers and any health related disaster happens due to production activity.
   - Public hearing conducted only for local villagers and not for worker/employees of industry, hence workers/employees should not be allow to participate in public hearing.

3. **Mr. Vitthal Laxmanrao Dhobale, Member, Green Foundation, Nagpur**
   - Whether project can be approved if it falls under 10 meters away from National Highway? Whether industry will compensate any damages to flora and fauna, deterioration of health and agriculture yield due to operation of industry. The noise level is going to be more than 72 decibels (A). The operation of industry is affecting sericulture and there is a loss of Rs.5.0 Lacs due to excessive noise pollution.

4. **Mr. Fatteh Singh Takarsingh Dhuni, Talegaon.**
   - While giving the employment, people from two communities such as Sikh & Muslim were ignored. It is requested to consider persons of these two communities for giving employment.

5. **Mr. Manish Sekar, Talegaon.**
   - What is the buffer zone shall be kept by proposed industry in respect to village and its habitation. Animals and birds are going to affected due to this project. Industry has not given employment to 75% of local villagers as per the NOC condition given by Grampanchayat. Is it allowed to conduct public hearing in the project site instead of Grampanchayat premises?
   - According to the rules, 2% of the annual profits is required to be spent for the local village under CSR and from last 19 years, how much CSR fund spent by project proponent to local village and handicapped person. Industry has not spent CSR towards development of villages.
   - Whether project proponent had obtained permission from concern department for testing of explosive?
   - Industry has paid tax since last 18-19 years at very low slab. Present slab for tax toward Grampanchayat is about 18.86 Lacs. There is a huge difference in current tax slab and what industry is paying since so many years. Industry has blocked the village road.
   - Industry has recruited people came from Madhya Pradesh. They have not given job to local villagers/peoples, hence local peoples opposes the proposed expansion of the project.

6. **Mr. Laxmanrao Wankhede, Talegaon.**
   - Before commissioning of the industry, we were carrying out agricultural activity in our farms satisfactorily. But due to the ongoing industry and expansion, our roads to agricultural fields have been blocked and due to lack of access from the last 18 years my land are lying barren.

7. **Shri Prakash Maniram Kaveroti, Talegaon.**
   - Due to the establishment of existing industry and expansion thereof, our access to our land has been blocked. There is no way to go into the field and despite the Collectors order regarding expedite the matter, it is still pending and we have not got any decision regarding access to our farm land.

8. **Mr. Prakash Waghmare , New Kakadadara.**
   - The Kakaddara petrol pump is about 950 meters away from project site. Whether public hearing is being conducted as per the Rule. Why public hearing conducted at the project site.

..4/-

- Information about proposed Environmental public hearing need to be given to nearby farmers. Nearby villagers, animals, birds were affected due to noise pollution. Crack observed in the local Dam due to blasting activity. Some of the houses developed crack due to blasting carried out by industry.
- In EIA report it is mentioned that, there is a green belt around 10 Km radius of the proposed site, however details about name of the villages existing in the 10 Km radius is not shown.
- The road belongs to Forest Department is being encroached by the industry. It is demanded to file Police report regarding encroachment.

9. Mr. Sunanda Reddy, Environmental Expert.

- He supported and suggested that the project proponent should adopt the rainwater harvesting system so as it is possible to collect and store rainwater and also provide green belt around the industry.

10. Mr. Kishenrao, Talegaon.

- Industry has blocked all roads leads to agriculture field.

11. Shri Chandrasekhar Choure, Talegaon.

- Project proponent has purchase and acquire farmer's land during the project inception, resulting the existing approached road to the farmer's agriculture land is blocked. The project proponent should provide an alternative road for the farmers and the testing should be done in accordance with the relevant department rules, so that the villages in the area will not be affected to noise pollution (shock and vibrations). This aspect should be taken care of. Also, this project has provided employment to the youths and women in the village and there should be no objection of the Gram Panchayat in giving approval for the expansion of the project.

- It was not appropriate to oppose the project in the pretext that the buildings in the vicinity of the project were been damaged by vibrations due to test blast carried out in the factory, in fact such incidents of damage has never been heard of and it is not correct to adduce such reasons for opposing the project.
- Requested to give employment to Sikh and Muslim people's family in this project. So as it will help this people to earn their regular livelived.

12. Mr. Ashish Gawande, Talegaon.

- The farmer's agriculture road has been blocked after the establishing the existing project. Therefore I had to sell my 12 acre agriculture land, which is only one source of income. Hence I lost my source of income.

- Industrialization should lead to development and employment generation, but due to noise pollution generated due to testing in the factory, the poultry farming business is affected, which is located at a distance of 500 meters.

13. Mr. Nanak Singh Telisingh Mowri, Talegaon.

- Why, project proponent has not given employment in existing project to Sikh community. Please explain about the same and also due to existing project there is effect on agriculture land and crop yield.

14. Mr. Roshan Taivade, New Kakadara.

- Industry is not taking due care of workers. Appropriate provisions are not taken for workers safety. Workers are terminated without any reasons.

15. Mr. Hirasingh Charan Singh Bala, Talegaon.

- This industry is in operation from last 15-17 years and no one from our community has been employed in this industry. Also, if the project proponent has given work to youth of our community then only this project will be welcomed by us.

16. Mr. Shankar Laxmanrao Mukare, New Kakadara.

- I have worked for 7 years in this ongoing industry, and after the strike by workers in the industry, 17 workers were removed from service and rendered unemployed.

17. Mrs. Joneka Babri, Talegaon.

- In the existing project there is no job opportunity, particularly for Sikh community youth and also project proponent does not engage in welfare work for development of local village. Women's working in the industry are not granted leave for incidental reasons. She will migrate to other location, in case of non-availability of job in this project.

18. Mr. Sagar Singh Sodi, Talegaon.

- The industry has also given employment to people of Madhya Pradesh instead of local people particularly Sikh Samuday people?

19. Mrs. Mukta Avarti; Talegaon.

- Which type of provisions/facility made by project proponent about the educations of children's and women's of local villages and also what type of step taken about safe guard of women's.

20. Mr. Sharad Tarpe, Upa Sarpanch, Kakaddara.

- There are no industries in a radius of 50 kms and there are no means of employment. As well as the existing industry has given employment to lots of people from 3 Talukas. Hence, suggested that, project proponent shall adopt the Kakaddara village for development.

21. Mr. Dinesh Kandulkar, Kakaddara.

- People of Kakaddara have been made aware about public hearing by giving drum beating. It is further requested to give employment to the un-employed youth of village Ramdara, Kakaddara & Talegaon.

22. Mr. Ramchandra, Talegaon.

- I have been working in the industry for the last 11 years. The project holder should refrain from threatening workers about termination from their jobs. The management should not bully the workers.

23. Mrs. Sapna Manore, Talegaon.

- The expansion of the industry should provide employment for the divorced and widowed women and she wanted to know the remuneration that would be paid to such women. Likewise, she asked for arrangements for child care and giving maximum employment to women.

24. Mr. Gurudev Singh Kartarsingh Bavari, Talegaon.

- The said proposed project is located near the locality, hence it may possibility to risk of pollution. Hence, suggested to established project from safe distance to avoid any effect on people. Also, urban facilities should be made available in the village through project proponent and they should provide facilities like Anganwadi center, drinking water facility, hospital, toilet/latrine facility and also give the written acceptance about recruitment of Sikh community people by project proponent.

PROJCT PROPONENT :

Project proponent has welcome about point raised by local people in respect of proposed project and gave the answer of questions which are asked during public hearing is as under;

- It is necessary to obtain permission for expansion of project near the existing project and also existing project is located near the National Highway, hence the expansion of project is carried out at proposed land.
- Currently, 477 KL (kiloliters)/ day (including recycle) of water is required to run the existing factory. Similarly 322KL of water per day (including recycle) will be required for the proposed expansion. These figures are clearly mentioned in EIA report.
- The industry has obtained permission from the Central Ground Water Authority to draw groundwater and the Company is drawing water as per the permission of CGWA. While permitting withdrawal of Ground water, CGWA considers the existing wells and ensures that the permitted withdrawal will not adversely affect the existing wells in study area.
- The mobile tower issue is not in the purview of project proponent.
- The living habitat in the radius of 10 Km like birds, animals, plant, village and forest study details are clearly mentioned in Environmental Impact Assessment report. There will be no adverse effect on flora and fauna.
- The noise level is monitored on an average of 8 hours during blasting time, which is found as per norms mentioned in EIA report.
- The noise monitoring is carried out on day & night time, which is found 40 to 50 dB(A) during night time. If, we consider the noise level of industrial area, which is 85 dB(A) is permissible to hear in case of normal human being. In fact noise level increase above 85 dB(A) it denoted as noise pollution.
- The project proponent has followed each and every Rules and guidelines of Government and obtained NOC's and permissions from Government time to time and also not blocked the farmer's road. Industry has adopted Zero Liquid Discharge System and generated waste water within plant is treated in effluent treatment plant i.e. 12000 liters of water per day is systematically processed and disposed of by Evaporation System. Similarly the industry has not let out / disposed any kind of water outside the factory premises. As well as industry has provided 350000 liters capacity of storage tank for storage treated effluent during the monsoon period.
- Currently the water required for the domestic use is 60000 liters per day. The domestic water used by workers for drinking and other facilities is nearly 60 liters per person per day and industry has set up a separate domestic sewage treatment plant for domestic water and the treated water is used for green belt / irrigation within plant premises.

- Mainly the largest amount of water required in the summer is to increase the humidity so as to reduce the static charge generation possibility in the process area. About 50000 to 70000 liters of water is used to increase humidity during the summer. Also, this industry not discharge any effluent which is treated or untreated inside or outside factory premises.

- The industry has obtained permission from the Central Ground Water Authority to draw groundwater and the Company is drawing water as per the permission of CGWA. While permitting withdrawal of Ground water, CGWA considers the existing wells and ensures that the permitted withdrawal will not adversely affect the existing wells in study area.

- Industry has withdrawal required water from dug well/well only. There is no any permission to withdrawal of water from bore well, also industry has not procure any water from villages. Due to extraction of ground water we ensure that, no any adverse effect on existing well located near area for that, we proposed to install rainwater harvesting system to enhance ground water level.

- It is ensured that, this project has followed all conditions about air pollution, which is imposed by MPCB and also providing air pollution control system to boiler to avoid air pollution.

- Regarding the road - The project proponent mentioned that there was no approach road from agriculture land passing through industry land and CDET has not encroached on any government or civic land. This question is handled by local Revenue Department, local Tahsildar.

- About 33% of the total project area is covered in green belt. There are 3200 surviving trees within plant area, 12000 new trees are proposed to be planted after expansion. These details are mentioned in EIA report (On the statement local villagers has taken objection and replied that, not carried out tree plantation as mentioned in EIA report).

- Under the Corporate Social Responsibility (CSR), an industry must spend up to 2% of its profits under CSR. In line with the prevailing guidelines the industry has shown its willingness to spend the necessary amounts in the prescribed seven areas as mentioned in EIA report. The Industry has made expenditure as per CSR rules. However if the expenditures are to be amended/ modified the industry may spend the fund as per guidance of the Honorable Collector. Also though industry has expended a part of the CSR funds through Tukdoji Maharaj Cancer Institute, Nagpur. (In this matter, Shri. Rahul Wankhede, RO, Maharashtra Pollution Control Board and Member Public Hearing Committee informed the project proponent that the expenditure of CSR funds should be made for the local villagers and further assured the villagers that the project proponent will make CSR expenditure for the welfare of local villagers including provision for local disabled).

- The Company while recruiting the employees does not discriminate on the basis of religion, caste or creed of the applicants. The industry already employs Muslims and has no problem in providing employment to Sikhs. Due to the hazard of static charge in the industry, there may be a risk to individuals having long hair / beard and it may be a hazard for individual / fellow workers also. However, it is wrong to say that the Sardar are intentionally not employed in the industry. CDET's top management said that such efforts will be made in the future by the industry to employment Sikhs as per needs of Industry. (On this answers objection raised by Sikhs Samuday people and submitted that, this type of rules not in any other industry).

- During blasting noise as well as vibrations are monitored regularly. Noise levels as well as vibration levels are as per prescribed industry standards.

..8/-

- The manufacturer in response to the noise pollution issue has clarified that destructive testing has to be carried out to establish the quality of the product manufactured by them. This testing is done in the restricted area and in line with the rules of Petroleum and Explosives Safety Organization (PESO). The sound/ noise generated during the testing are for a short / instant duration. Similarly all efforts are made to reduce the intensity of the Sound and necessary steps are taken to ensure that the effects of shock waves are muffled and no damage is suffered in the vicinity of the testing area.

Smt. Vijaya Bankar, Chairman, Public Hearing Panel (Additional District Magistrate & Resident Deputy Collector, Wardha) has informed to public that all views and comments are noted and recorded. This proceeding will be submitted to the Environment Ministry for further consideration. **Shri.Rahul Wankhede, RO, MPCB & Member of public hearing panel** has summarized the proceeding of public hearing in detail and **Shri.Anand Katole, SRO, MPCB** thanked all the officials, public and local villagers present in the public hearing. The public hearing is concluded with the vote of thanks to the chair.

(Anand Katole)
Sub-Regional Officer-II,
MPC Board, Nagpur &
Convener of the Public
Hearing Panel

(Rahul Wankhede)
Regional Officer,
MPC Board, Nagpur &
Member of the Public
Hearing Panel

(Vijaya Bankar)
Additional District Magistrate &
Resident Deputy Collector, Wardha
and Chairman of the Public Hearing
Panel

मे. सिडेट एक्स्लोजिव्ह इंडस्ट्रीज प्रा.लि. गांव मौजा-तळेगांव (शा.पं.) , ता.आष्टी, जि.वर्धा या ठीकाणी खनन विस्फोटके आणि प्रस्तावित उच्च उर्जा सुरक्षा उत्पादनांच्या विद्यमान प्रकल्पाच्या विस्तारासाठी प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि. ०६/०८/२०१९.

मे. सिडेट एक्स्लोजिव्ह इंडस्ट्रीज प्रा.लि. गांव मौजा-तळेगांव (शा.पं.) , ता.आष्टी, जि.वर्धा या ठीकाणी खनन विस्फोटके आणि प्रस्तावित उच्च उर्जा सुरक्षा उत्पादनांच्या विद्यमान प्रकल्पाच्या विस्तारासाठी प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक ०६ ऑगस्ट २०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्पाचे स्थळ मे. सिडेट एक्स्लोजिव्ह इंडस्ट्रीज प्रा.लि., गांव मौजा-तळेगांव (श.पं.), ता.आष्टी, जि.वर्धा येथे श्रीमती विजया बनकर, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री.राहुल वानखेडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य होते व श्री.आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत. **(सहपत्र-१)**.

पार्श्वभूमी

मे. सिडेट एक्स्लोजिव्ह इंडस्ट्रीज प्रा.लि. ची स्थापना सन १९९८ मध्ये झाली आणि जानेवारी २००१६ मध्ये उत्पादन सुरू झाले. कंपनी स्फोट आरंभ करणारी उपकरणे आणि खाणी स्फोटक द्रव्ये तयार करते आणि घातक उद्योग म्हणुन वर्गीकृत केली जाते. सुरक्षित कार्य वातावरण सुनिश्चित करण्यासाठी कंपनी आणि त्याचे सर्वोच्च व्यवस्थापन प्रभावी सुरक्षितता, संचालन आणि कार्य पर्यावरणाच्या मापदंडाच्या अंमलबजावणीसाठी वचनबध्द आहेत. कपंनी प्रामुख्याने संरक्षण अनुप्रयोगांच्या उत्पादनांचा विस्तार प्रस्तावित करते. नागपूर/वर्धाच्या धोरणात्मक स्थानाचा विचार करून, भारत सरकार ने या क्षेत्रातील संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून विकसीत करण्याचा निर्णय घेतला आहे आणि या व्यवसायाच्या संधीचा विचार करून सिडेट च्या व्यवस्थापकांनी उत्पादनांची श्रेणी विस्तृत करण्यासाठी निर्णय घेतला आहे. सिडेट भारतात विस्फोटक आरंभ करणाऱ्या उपकरण/उच्च दर्जा उत्पादनांच्या अग्रगण्य उत्पादकांपैकी एक आहे आणि प्रस्तावित व्यवसायामध्ये पुरेसा अनुभव आहे.

खनन विस्फोटकांच्या निर्मितीसाठी विद्यमान प्रकल्पाच्या विस्तारासाठी वैधानिक आवश्यकता पूर्ण करण्यासाठी आणि प्रस्तावित मसुदा ToR सह, फॉर्म-1, प्री-फिजीबिलीटी रिपोर्ट पर्यावरण व वन मंत्रालय आणि हवामान बदल कडे सादर करण्यात आला. तज्ञ मुल्यांकन समिती, नवी दिल्लीद्वारा मानक ToR जारी करण्यात आला आहे. समितीने २१ जून २०१८ रोजी पर्यावरण वन आणि हवामान बदल, नवी दिल्ली ने पत्र क्र. F.No. IA-JA-11011/166/2018-IA-11(I) संदर्भाच्या अटी मान्य केल्या.

मे.सिडेट एक्सप्लोजिव्ह या उद्योगाने पर्यावरण, वने आणि हवामान बदल, नवी दिल्ली यांनी मंजूर केलेल्या संदर्भ (ToR) अटी नुसार पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अभ्यासक्रम घेण्याकरीता मे.एनॉकॉन लेबॉरेटरीज लि. नागपूर यांना नेमले आहे.

प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने अध्यक्ष, लोकसुनावणीचे समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम श्रीमती विजया बनकर निवासी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, वर्धा व अध्यक्षा जन लोकसुनावणी समिती, यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रस्तावित उत्पादनाच्या परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करणार. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी किंवा लेखी स्वरूपात मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेवून ते शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०२/०७/२०१९ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे, त्याबद्दल कळविले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले हाते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत २ तक्रारी तसेच लोकसुनावणी दरम्यान ५ तक्रारी व ४ निवेदने प्रकल्पाच्या समर्थनार्थ म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झाल्या. तदनुसार, मंडळाचा आदेश क्र. ई-४९/२०१९ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-2663 dtd. 17/07/2019 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत तसेच लोकसुनावणी पुर्वी / दरम्यान प्राप्त तक्रारी व समर्थनाच्या प्रती सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३).**

तद्नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत खनन विस्फोटके आणि प्रस्तावित उच्च उर्जा सुरक्षा उत्पादनांच्या विद्यमान प्रकल्पाच्या विस्तारासाठी व पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणार परिणाम, परिसरातील प्रकल्पग्रस्त लोकांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाई, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, काळजी व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरण झाल्यावर श्री.आ.नि.काटोल, उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक यांनी उपस्थित नागरिकांना या प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपले अभिप्राय, विचार, टिका, टिप्पणी व प्रश्न विचारण्याबाबत आव्हान केले. त्याप्रमाणे खालील नमुद लोकांनी आपले अभिप्राय, विचार, टिका, टिप्पणी व प्रश्न मांडले.

<u>कार्यवृत्त :</u>

१. **श्री. रूपेश ढोबळे, तळेगांव**

- सद्यस्थितीत चालु असणारा प्रकल्प व प्रस्तावित / विस्तारीकरण होणाऱ्या प्रकल्पाला लागणारे पाणी हे प्रकल्प सभोवताली असणाऱ्या गावांना लागणाऱ्या पाण्यापेक्षा दुप्पट असून, सदर पाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत कोणती व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच त्या प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर कुठे करणार आहे.
- पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अभ्यासक्रम दरम्यान भूगर्भीय पाण्याचे नमुने घेण्यात आलेली गांवे/ठिकाणे कोणती. तसेच पाण्याची पातळीवर त्याचा काय परिणाम होणार आहे. तसेच १० कि.मी. परिसराचा अभ्यास करतांना फक्त जंगलाबाबत उल्लेख केलेला असून, त्यात येणाऱ्या गावांचा उल्लेख केलेला नाही.
- वृक्ष लागवड ही एका हेक्टरमध्ये १५०० वृक्ष असणे आवश्यक आहे, ३३ टक्के हरितपट्टासाठी एवढी वृक्ष आहेत काय.

२. **श्री. चंद्रशेखर, तळेगांव**

- लोकसुनावणीचा अर्थ काय, कशासाठी व ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये येणाऱ्या उद्योगाला विस्तारीकरण करण्याकरीता परवानगीचा अधिकार ग्रामसभेला आहे. ग्रामसभेला अधिकार असतांनी ही लोकसुनावणी ही खाजगी ठिकाणी आवारात कसे आयोजीत केली. तसेच विस्तारीकरणामुळे तळेगांव गावांला होणाऱ्या धोक्याबाबत उपाययोजना व तेथील नागरीकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर कोणती उपाययोजना करणार व याबाबत कंपनी जबाबदारी घेईल काय?
- लोकसुनावणीमध्ये तळेगांव ग्रामवसीयांसाठी आहे. परंतु लोकसुनावणीमध्ये उद्योगामधील कामगारांना उपस्थित राहण्याची परवानगी कामगारांना नाही. तळेगांव येथील ग्रामस्थांची आरोग्याबाबत कंपनी जबाबदारी घेणार काय? तसेच कामगारांची उपस्थिती ग्राह्य धरू नये.

३. **श्री. विठ्ठल लक्ष्मणराव ढोबळे, सदस्य, ग्रीन फाउंडेशन, नागपूर**

- प्रस्तावित प्रकल्प हा राष्ट्रीय महामार्गापासून १० मीटर अंतरावर असल्यामुळे हा मंजुर करण्यात येतो काय? तसेच कोळसा जळाल्यामुळे सभोवताली पशु पक्षी, शेतातील पिके व नागरीकांच्या आरोग्यावर काय परिणाम होणार व होणाऱ्या शेतीच्या उत्पादनाची घट या उद्योगामार्फत भरपाई स्वरूपात मिळेल काय. तसेच ध्वनीची पातळी ही ७२ डेसीबलपेक्षा जास्त राहणार आहे. तसेच ५०० मीटर अंतरावरील शेतामध्ये असणाऱ्या रेशीम उद्योगावर सदर उद्योगाच्या ध्वनीच्या पातळीमुळे परिणाम झाले व रू.५.० लक्ष एवढे आर्थीक नुकसान झाले, असे सांगितले.

४. **श्री. फतेहसिंह तकरसिंह धुनी, तळेगांव.**

- प्रस्तावित प्रकल्प आल्यास सदर प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होणार आहे. परंतु मुख्य:त्वे शिख व मुस्लीम या दोन जातीच्या लोकांना सदर उद्योगामध्ये नोकरी दिली जात नाही. तसेच त्यांनी विनंती केली आहे की, या दोन जातीच्या लोकांना प्रस्तावित प्रकल्पामध्ये नोकरी देण्यात यावी.

५. **श्री. मनिष सेकार, तळेगांव.**

- प्रस्तावित प्रकल्प हा गांव तसेच नागरी वस्तीपासून किती अंतरावर असायला पाहीजे. तसेच प्रकल्पाचा परिणाम पशु-पक्षी यांच्यावर होणार आहे. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीने दिलेल्या NOC प्रमाणे ७५ टक्के स्थानिक लोकांना प्रकल्पामध्ये रोजगार मिळणे अपेक्षीत आहे, तो मिळाला नाही. तसेच सदर जन लोकसुनावणी ही ग्रामपंचायत कार्यालयामध्ये घेण्याऐवजी प्रकल्प स्थळावर घेणे योग्य आहे काय.

- नियमानुसार होणाऱ्या वार्षीक नफ्यामध्ये २ टक्के फंड हा CSR अंतर्गत स्थानिक गावांसाठी खर्च करणे आवश्यक असतांना गेल्या १९ वर्षापासून सदर उद्योगामार्फत किती फंड CSR अंतर्गत गावाला देण्यात आला. तसेच सदर निधी हा अपंगासाठी सुध्दा खर्च न केल्याबाबत प्रश्न केला.
- सद्यस्थितीत सुरू असणाऱ्या उद्योगामध्ये केल्या जाणाऱ्या टेस्टींगकरीता संबंधित विभागाकडुन परवानगी घेतली आहे काय?
- सदर उद्योगाने १८ ते १९ वर्षाचा कर हा कमी प्रमाणात भरणा केला आहे. सध्याच्या मोजणीप्रमाणे उद्योगांवर रू.१८.८६ लक्ष एवढा कर भरणा केला असून आधीचा कर व सध्याचा कर यामध्ये तफावत आहे. तसेच शेतकऱ्यांचा रस्ता बंद केल्याबाबत सांगितले.
- सदर उद्योगामध्ये मध्यप्रदेश राज्यातील कामगार काम करीत आहे. स्थानिक लोकांना रोजगार दिलेला नाही. तसेच सदर प्रस्तावित प्रकल्पाला विरोध दर्शविला.

६. **श्री. लक्ष्मणराव वानखेडे, तळेगांव.**
- प्रकल्प येण्यापुर्वी आम्ही शेतपिकाचे उत्पादन समाधानकारकरित्या करीत होतो. परंतु सद्यस्थितीत सुरू असलेल्या उद्योगामुळे तसेच विस्तारीकरणामुळे आमच्या शेतीमधले रस्ते बंद झाले असून शेतीसाठी जायला रस्ता नसल्यामुळे परिणामी मागील १८ वर्षापासून शेतजमीन पडीत आहे.

७. **श्री. प्रकाश मनिराम कवरोती, तळेगांव.**
- सद्यस्थितीत सुरू असलेल्या उद्योगामुळे तसेच विस्तारीकरणामुळे आमच्या शेतीमधले रस्ते बंद झाले आहेत. याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी आदेश देवून सुध्दा सदर बाबीची चौकशी अपुर्ण असून रस्त्यांबाबत निर्णय मीळाला नसल्यामुळे शेतामध्ये जायला रस्ता नाही.

८. **श्री. प्रकाश वाघमारे, नवीन काकडदरा.**
- सदर उद्योग हा नवीन काकडदरा गांव पेट्रोलपंम्पापासुन ९५० मीटर अंतरावर आहे. तसेच सदर लोकसुनावणी ही नियमाप्रमाणे घेण्यात येत आहे काय, असल्यास प्रकल्पस्थळी लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन काय?
- सदर लोकसुनावणी बद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी कळविणे आवश्यक होते. तसेच ध्वनी प्रदूषण व ध्वनी प्रदूषणाचा परिणाम अनेक लोकांवर, पशु पक्षांवर व लगतच्या कालव्यावर टेंस्टींग दरम्यान स्फोटाच्या कंपनामुळे तळे गेल्याबाबत सांगितले. तसेच नवीन काकडदरा गावांतील घरांना तळे गेल्याबद्दल नमुद केले आहे. तसेच सदर बाबीमध्ये केलेल्या तक्रारीवर अद्याप तहसिलदारामार्फत कार्यवाही झाली नसल्याचे सांगितले.
- प्रस्तावित उद्योगाच्या सभोवती १० कि.मी. परिघामध्ये हरितपट्टा असल्याचे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद केले असून गावांबद्दलची माहिती त्यात दिलेली नसल्याबद्दल आक्षेप नोंदविला.
- उद्योगाने शेतकऱ्यांच्या रस्त्यावर अतिक्रमण करून ताब्यात घेतला व हा रस्ता वन विभागाने दिलेला आहे. यावर उद्योगांवर फौजदारी गुन्हा दाखला करण्याबाबत नमुद केले.

९. **श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरण तज्ञ.**
- यांनी प्रकल्पास समर्थन दर्शवून पावसाचे पाणी संकलन व साठवणूक करून जमिनीत मुरवण्यामध्ये तसेच उद्योगाच्या सभोवताली हरितपट्टा तयार करण्याबाबत सुचविले.

१०. **श्री. किशनराव, तळेगांव.**
- सद्यस्थितीत सुरू असलेल्या उद्योगामुळे तसेच विस्तारीकरणामुळे आमच्या शेतामधले रस्ते बंद झाले आहेत.

११. **श्री. चंद्रशेखर चोरे, तळेगांव.**

- प्रकल्पांनी शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेवून, शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये जाणारा रस्ता बंद झाला आहे. प्रकल्पानी शेतकऱ्यांसाठी पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी व टेस्टींग ही संबंधित विभागाच्या नियमाला अनुसरून करावी, जेणेकरून परिसरातील गावांना हादरे बसणार नाही, याची काळजी घेता येईल. तसेच सदर प्रकल्पामुळे परिसरातील गावांमधील युवकांना तसेच महिलांना रोजगार उपलब्ध झाला असून, सदर प्रकल्प आल्यास ग्रामपंचायत मार्फत सदर प्रकल्पाला विस्तारीकरणाची परवानगी देण्यास हरकत नाही.
- या प्रकल्पास विरोध करणे योग्य नसून प्रकल्पा अंतर्गत असणाऱ्या इमारतीला टेस्टींगमुळे तळे गेल्याचे किंवा इमारीतमधील काचांचे खिडक्यांचे नुकसान झाल्याचे कधी ऐकण्यात आलेले नसून फक्त विरोध करायचा म्हणुन विषयांशी संबंधित बाबी मांडणे योग्य नाही, असे मत व्यक्त केले.
- सरदार व मुस्लीमांना प्रकल्पामध्ये रोजगार दिल्यास त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालण्यास मदत होईल, अशी विनंती केली.

१२. **श्री. आशिष गावंडे, तळेगांव.**

- प्रकल्पांनी शेतकऱ्याच्या जमिनी विकत घेवून, शेतकऱ्यांच्या शेतीमधला रस्ता बंद झाला आहे. त्यामुळे मला माझी १२ एकर शेती ही विकावी लागली. त्यामुळे माझे उत्पादनाचे साधन हरविले. तसेच
- औद्यागिकरणाचा विकास व्हायला पाहीजे व रोजगार मिळाला पाहीजे. परंतु सदर उद्योगामध्ये होणाऱ्या टेस्टींग दरम्यान ध्वनीच्या पातळीमुळे ५०० मीटर अंतरावरील कुक्कुटपालनावर परिणाम झाला आहे. तसेच सदर लोकसुनावणी ही गावांमध्येच व्हायला पाहीजे.

१३. **श्री. नानकसिंह तेलसिंह मोवरी, तळेगांव.**

- सदर प्रकल्पामधील प्रशासनाने शिख व सरदार जातीच्या युवकांना जाणीवपुर्वक रोजगार दिलेला नसून,सदर रोजगार कां देत नाही, याबाबत प्रकल्पधारकाने खुलासा करावा. तसेच सदर उद्योगामुळे परिसरातील शेती उद्योग प्रभावित झाला असून शेती उत्पादनावर त्याचा परिणाम झाल्याबाबत सुचविले.

१४. **श्री. रोशन तायवाडे, नवीन काकडदारा.**

- सूरू असलेल्या प्रकल्पामध्ये कामगारांकडुन कोणत्या प्रकारचे काम करून घेतल्या जाते. तसेच कामगारांच्या सुरक्षाबद्दल काय उपाययोजना केलेली आहे. तसेच सदर उद्योगामध्ये कामगरांना सूचना न देता कामावरून कमी करण्यात येते.

१५. **श्री. हिरासिंह चरणसिंह बाला, तळेगांव.**

- सदर उद्योग मागील १५ ते १७ वर्षापासून कार्यरत असून आमच्या समाजाचा एकही व्यक्ती या उद्योगामध्ये कार्यरत नाही. तसेच प्रस्तावित उद्योगामध्ये समाजातील तरूणांना काम दिल्या गेले तर सदर प्रकल्पाचे आमच्यामार्फत स्वागत केल्या जाईल.

१६. **श्री. शंकर लक्ष्मणराव मुकरे, नवीन काकडदारा.**

- सदर सुरू असलेल्या उद्योगामध्ये मी ७ वर्ष काम केले असून, उद्योगामध्ये कामगारामार्फत केल्या गेलेल्या संपानंतर १७ कामगारांना बेरोजगार करण्यात आले.

१७. **श्रीमती. जोनेका बाबरी, तळेगांव.**

- सदर सुरू असलेल्या उद्योगाने गावांच्या विकासासाठी काहीच केलेले नसून गावांतील शिख समुदायातील मुलांना रोजगार दिला जात नाही. उद्योगात काम करणाऱ्या स्त्रियांना नैमित्तीक कारणाकरीता रजा दिली जात नाही. उद्योगामध्ये रोजगार न मिळाल्यास गांव सोडून जाणार असे सांगितले.

१८. **श्री. सागरसिहं सोडी, तळेगांव.**

- सदर सुरू असलेल्या उद्योगामध्ये गावांतील शिख समुदायातील युवकांना तसेच स्त्रियांना सुध्दा रोजगार दिलेला जात नाही. तसेच सदर उद्योगाने मध्यप्रदेश राज्यामधील लोकांना रोजगार दिलेला असून, स्थानिक लोकांना मात्र रोजगारापासून वंचित ठेवलेले आहे. याबद्दल उद्योग प्रशासनाने उत्तर दयावे.

१९. **श्रीमती. मुक्ता अवरती, तळेगांव.**

- उद्योगाने स्थानिकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी व महिलासांठी काय उपाययोजना केली व महिलांच्या सुरक्षेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या.

२०. **श्री. शरद टरपे, उपसरपंच, काकडदरा.**

- ५० कि.मी. च्या परिसरात एकही उद्योग कार्यरत नसून रोजगाराची साधन नाही. सदर उद्योगामध्ये ३ तालुक्यामधील लोकांना रोजगार मिळालेला आहे. उद्योगाने काकडदरा गांव दत्तक घ्यावा.

२१. **श्री. दिनेश कांदुलकर, सरपंच, काकडदरा**

- सदर लोकसुनावणीच्या स्थळ दिनांकाबाबत काकडदरा गावांमध्ये दवंडी देवून लोकांना सूचित करण्यात आले होते. तसेच काकडदरा, रामदरा व तळेगांव मधील बेरोजगारांना उद्योगामध्ये रोजगार देण्यात यावा.

२२. **श्री. रामचंद्र, तळेगांव.**

- मी मागील ११ वर्षापासून उद्योगामध्ये कार्यरत आहे. प्रकल्पधारकाने कामगारांना धमक्या देणे, नोकरीवरून कमी करणे टाळावे. तसेच उद्योग व्यवस्थापनाने गुंडागर्दी करू नये. उद्योगाने कामगरांना सामाजिक मदत करावी. प्रकल्पास विरोध नाही.

२३. **श्रीमती. सपना मनोरे, तळेगांव.**

- उद्योगाच्या विस्तरीकरणामध्ये घटस्फोटीत व विधवा महिलांना रोजगार देण्यात व त्यांना किती मानधन मिळणार. त्याचप्रमाणे त्यांच्या मुलांना संगोपनासाठी व्यवस्था तसेच जास्तीत जास्त रोजगार महिलांना देण्याबाबत सांगितले.

२४. **श्री. गुरूदेवसिंह करतारसिंह बावरी, तळेगांव**

- सदर प्रस्तावित उद्योग लोकवस्तीपासून जवळ असल्यामुळे प्रदूषणाचा धोका नाकारता येत नाही. तसेच सदर प्रस्तावित उद्योग हा गावांपासून सुरक्षित अंतरावर सुरू करावा. तसेच उद्योगामार्फत गावांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी, जसे की अंगणवाडी केंद्र, पिण्याच्या पाण्याची सुविधा, दवाखाना व संडास या सुविधा पुरवाव्यात.
- उद्योगामध्ये सरदारांना रोजगार दिला जात नाही. याबाबत उद्योगाने लेखी आश्वासन द्यावे.

प्रकल्प प्रस्तावक : प्रकल्प प्रवर्तकाने उपस्थित नागरीकांनी मांडलेल्या सुचनांबद्दल अभिनंदन केले व त्यांच्या सुचनांचे तसेच प्रश्नांचे उत्तर खालीलप्रमाणे सांगितले.

- सदर उद्योगाच्या विस्तारीकरणासाठी मुळ उद्योगाच्या ठिकाणी परवानगी घेणे आवश्यक असते. त्यामुळे मुळ उद्योग हा राष्ट्रीय महामार्गानजीक असल्यामुळे सदर उद्योगाचे विस्तारीकरण त्याच ठिकाणी करण्यात येत आहे.

- सध्या कारखाना चालविण्यासाठी ४७७ किलो लिटर प्रतीदिन पाण्याची आवश्यकता आहे. तसेच विस्तारीकरणासाठी ३२२ किलो लिटर प्रतीदिन एवढ्या पाण्याची आवश्यकता राहील.

- भूगर्भातील पाणी घेण्यासाठी सदर उद्योगाने केन्द्रीय भूजल विभागाची परवानगी सदर उद्योगाने घेतली असून उद्योगाकडुन त्यांनी आखून दिलेल्या नियमाप्रमाणे पाण्याची उचल भूगर्भातून करण्यात येते. सदर परवानगी देतांना केन्द्रीय भूजल विभागाने पाणी काढण्याकरीता परिसरातील विहिरी कोरड्या होणार नाही. या मानकांचा विचार करून परवानगी देण्यात येते.

- मोबाईल टॉवरबाबत हा विषय सदर उद्योगाच्या कार्यक्षेत्रात मोडत नाही.

- पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये परिसरातील १० कि.मी. परिघामधील येणारे जैविक उदा.पशु पक्षी, जनावरे, वृक्ष, गांवे व वने याचा अभ्यास केन्द्र सरकारच्या नियमाप्रमाणेच करण्यात आलेला आहे.

- ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजतांना आठ तासांच्या सरासरीमध्ये मोजण्यात आलेली असून सदर मोजणी ही स्फोटादरम्यान घेण्यात आलेली असून विहित मर्यादेत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंदविल्याप्रमाणे आहे.

- ध्वनीची पातळी दिवसा व रात्रीच्या वेळेस मोजमापन केल्या जात असून रात्रीच्या वेळी ४० ते ५० डेसीबल दरम्यान असते. तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये ध्वनीची पातळी ही ८५ डेसीबल असेल तर ही पातळी स्वस्थ माणसाला सहन करण्याजोगी असते. तसेच ९५ डेसीबल असेल तर ते ४ तासापर्यंत परवानगी असते. तसेच ध्वनी प्रदूषण हे ८५ डेसीबलच्या पुढे जर ध्वनीची तीव्रता असेल तर त्याला ध्वनी प्रदूषण मानन्यात येते.

- सदर उद्योगाने शासनाच्या प्रत्येक नियमाचे पालन केलेले असून प्रत्येक प्रकारासाठी आवश्यक त्या परवाने घेतले असून रस्ता अडवणूक करणे अशा प्रकारचे कोणतेच काम केलेले नाही. उद्योगामध्ये झिरो लिक्वीड डिसचार्ज ही प्रणाली अवलंबीलेली असून १२००० लिटर प्रतीदिन पाणी हे व्यवस्थितरित्या प्रक्रिया करून इव्हापोरेशन सिस्टीमद्वारे विल्हेवाट करण्यात येते. तसेच सदर उद्योगातुन कुठल्याही प्रकारचे पाणी उद्योगाबाहेर सोडल्या जात नाही. तसेच पावसाळ्या दरम्यान प्रक्रियायुक्त पाणी साठवण्याकरीता ३५०००० लिटर इतक्या क्षमतेची व्यवस्था उद्योगाने कार्यान्वित केलेली आहे.

- सद्यस्थित उत्पादनाकरीता लागणारे पाणी हे ६०००० लिटर इतके असून उद्योगामध्ये कामगारांमार्फत वापरण्यात येणारे ६० लिटर प्रती व्यक्ती प्रतीदिन पाण्याकरीता उद्योगाने स्वतंत्र घरघुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा बसविलेली असून प्रक्रियायुक्त पाणी हे हरितपट्टा तयार करण्याकरीता वापरण्यात येते.

- मुख्य:त्वे सर्वात जास्त पाणी हे उन्हाळ्यामध्ये स्टॅटीकचार्ज दरम्यान आर्द्रता वाढविण्यासाठी जवळपास ५०००० ते ७०००० लिटर पाणी हे उन्हाळ्याच्या काळामध्ये फक्त आर्द्रता वाढविण्याकरीता करण्यात येते. तसेच प्रत्यक्ष उत्पादनाकरीता खूप थोड्या पाण्याची आवश्यकता असते. तसेच सदर उद्योगाद्वारे अप्रक्रियायुक्त/प्रक्रियायुक्त असे कोणत्याही प्रकारचे पाणी उद्योगाच्या बाहेर खुल्या जमिनीवर टाकण्यात येत नाही.

- भूगर्भीय पाण्याची उचल ही केन्द्रीय भूजल विभागामार्फत मिळालेल्या परवानगी प्रमाणे करण्यात येते. त्याबाबतचा अहवाल सदर विभाग तसेच मप्रनि मंडळ यांना वेळोवेळी सादर करावयाचा असतो.
- उद्योगाला लागणारे पाणी हे फक्त डगवेल किंवा वेल मधूनच घेता येते. बोरवेल करण्याची परवानगी उद्योगाला नसुन बोरवेलमार्फत कोणत्याच प्रकारचे पाण्याचे उचल करण्यात येत नाही. तसेच नागरी परिसरातील नागरीकांच्या हक्काचे पाणी या उद्योगामार्फत वापरण्यात येत नाही. तसेच उद्योगाला लागणाऱ्या पाण्यामुळे परिसरातील जल साठ्यावर अथवा विहिरीवर परिणाम होणार नाही. त्याचप्रमाणे उद्योगामार्फत रेनवॉटर हर्व्हेस्टिंग प्रणाली (Rain water Harvesting) उभारण्यात येणार असून सदर पाणी हे जलस्तर वाढविण्याकरीत भूगर्भामध्ये मुरविण्याचे प्रस्तावित आहे.

* हवा प्रदूषणासंबंधी मप्रनि मंडळाने घालून दिलेल्या अटी व शर्तीप्रमाणे स्वतंत्र धुरांडा तथा हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेली असून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांचे उल्लंघन होणार नसल्याची हमी देण्यात आली.

* रस्त्यासंबंधी — सदर उद्योगाने घेतलेल्या शेतीमधुन कोणत्याच प्रकारची पादंण नसून रस्त्याबाबतीत उद्योगाने सरकारी अथवा नागरी जमिनीवर अतिक्रमण करून रस्ता अडविला नसल्याबाबत प्रकल्पधारकाने नमुद केले (सदर उद्योगावर गावकऱ्यांनी आक्षेप घेतला असून रस्त्याबाबत महसुल विभाग तथा स्थानिक तहसिलदारांनी योग्य ती कार्यवाही करून निर्णय दयावा असे अध्यक्षांना सांगितले).

* हरितपट्टयाबद्दल सुरू असलेला उद्योग तथा विस्तारीकरण यांच्या एकुण जमिनीपैकी ३३ टक्के एवढी जमिन हरितपट्टया अंतर्गत उपलब्ध असून सद्यस्थित ३२०० इतके वृक्षलागवड करण्यात आलेली असून विस्तारीकरणामध्ये १२००० नवीन वृक्षलागवड करण्याचे प्रस्तावित आहे (सदर मुद्दयावर ग्रामस्थांनी आक्षेप घेतला असून ३३ टक्के म्हणजे किती क्षेत्र याबद्दल माहिती देण्यास सांगितले. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये नमूद असल्याप्रमाणे वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही. असे नमुद केले).

* उद्योगाचे सामाजिक दायित्व (CSR) अंतर्गत उद्योगाने नफ्याच्या २ टक्के इतका खर्च CSR अंतर्गत करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे सदर उद्योगाने CSR मध्ये दिलेल्या ७ मुद्दयांप्रमाणे खर्च करण्यास तयारी दर्शविणे आली होती. तसेच सामाजिक तत्वानुसार उद्योगाने खर्च केलेला असून त्यात फेरबदल पाहीजे असल्यास मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार फेरबदल करून सदर निधी खर्च करण्यास येईल. तसेच उद्योगामार्फत CSR अंतर्गत तुकडोजी महाराज कॅन्सर संस्था, नागपूर मार्फत करण्यातय येते. (सदर मुद्दयांवर स्थानिक नागरीकांनी आक्षेप घेतला असून CSR अंतर्गत येणारा निधी हा स्थानिक गावांकरीता खर्च केलेला नसून इतरत्र खर्च केल्याबद्दल गावकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. सदर बाबीमध्ये श्री.राहुल वानखेडे, प्रा.अ. मप्रनि मंडळ तथा सदस्य लोकसुनावणी समिती यांनी प्रकल्पधारक तथा स्थानिक गावकऱ्यांकरीत CSR निधी खर्च करण्याबाबत प्रकल्पधारकास अवगत करून लोकांना तसे आश्वासित केले)

* उद्योगाला सरदार, मुसलमान या लोकांना रोजगार देण्यास कोणत्याच प्रकारची हरकत नाही. तसेच या उद्योगामध्ये सरदार व मुसलमान व्यक्ती कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे उद्योगामधील स्टॅटिक चार्ज नियमामुळे वाढविलेले केस असणाऱ्या व्यक्तींना उद्योगात धोका निर्माण होवू शकतो. तरी जाणीवपुर्वक सरदारांना रोजगार दिला जात नाही, असे म्हणणे चुकीचे असून उद्योगामार्फत भविष्यात तसा प्रयत्न करण्यात येईल असे प्रकल्पधारकाने सांगितले. (सदर उत्तरावर शिख समाजाच्या नागरीकांनी आक्षेप घेतला असून इतरत्र कोणत्याही उद्योगामध्ये अशाप्रकारचा भेदभाव करण्यात येत नाही, असे सांगितले)

* स्फोटामधून निघणाऱ्या ध्वनीबाबत उद्योगधारकाने दिलेल्या उत्तराप्रमाणे सदर उद्योग हा स्फोटके व त्यासाठी लागणारे सूटे भाग बनविण्याचा असल्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता निर्धारीत करण्यासाठी टेस्टींग करणे आवश्यक असते. सदर टेस्टींग ही विस्फोटके व निरिक्षणे विभाग यांच्या नियमाप्रमाणे प्रतिबंधीत क्षेत्रात करण्यात येत असून त्याचा ध्वनी हा काही काळ येतो. त्याचप्रमाणे ध्वनी कमी प्रमाणात निघण्यासाठी योग्य ती उपाययोजना करण्यात येते. तसेच टेस्टींग दरम्यान हादरे बसणार नाही, याची काळजी सुध्दा प्रकल्पाधारकामार्फत घेण्यात येते.

लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षा श्रीमती विजया बनकर यांनी नागरीकांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता प्रकल्पधारकास सूचना दिल्या. तसेच लोकसुनावणी दरम्यान नागरीकांकडुन मांडण्यात येणारे प्रश्न हे पर्यावरण विषयक असावे, याबद्दल लोकांना वेळोवेळी संबोधित केले. तसेच श्री.राहुल वानखेडे, प्रा.अ. मप्रनि मंडळ तथा सदस्य लोकसुनावणी समिती यांनी विचारण्यात येणारे प्रश्न पर्यावरणावर संबंधित असावे. याबाबत सूचित केले. तसेच सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन

समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आली आहे याबद्दल कळविले. पर्यावरण विषयक समितीच्या अध्यक्षा श्रीमती विजया बनकर यांनी सुनावणीचे सर्व समावेशक इतिवृत्त पर्यावरण विभागात पाठविले जाणार याबाबत उपस्थित नागरिकांना कळविले. पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच माननीय अध्यक्षा यांच्या परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

(आनंद काटोले)
उप-प्रादेशिक अधिकारी-२,
म.प्र.नि.मंडळ, नागपूर व
समन्वयक, लोक सुनावणी
समिती

(राहुल वानखेडे)
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, नागपूर व
सदस्य, लोक सुनावणी समिती

(विजया बनकर)
अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, वर्धा व
अध्यक्ष, लोक सुनावणी समिती